# मराठी न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२





# पवना बंद जलवाहिनी प्रकल्पाची स्थगिती उठली!

## पिंपरी- चिंचवडकरांचा पाणी प्रश्न कायमस्वरूपी सुटणार

**भोसरी। न्यूज एक्सप्रेस मराठी ।**

पिंपरी- चिंचवड शहरातील पाणी समस्या कायमस्वरूपी सुटण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. पवना धरणातून बंदिस्त जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी हाती घेतलेल्या प्रकल्पाचा ''जैसे थे'' आदेश तब्बल १२ वर्षाच्या लढ्यानंतर उठवण्यात आला.भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांनी २०१४ पासून सुरू केलेला पाठपुरावा अखेर यशस्वी ठरला. विधानसभा अधिवेशनाच्या निमित्ताने त्यांनी सभागृहात वारंवार हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यामुळे राज्याच्या नगरविकास विभागाने हा 'जैसे थे' आदेश रद्द करण्याची घोषणा केली आहे. तसे पत्र पिंपरी- चिंचवड महापालिका प्रशासनाला पाठवले आहे. तत्कालीन राज्य सरकारने २०११ मध्ये या प्रकल्पला 'जैसे थे' आदेश दिला होता. त्यामुळे सुमारे १७० कोटी रुपयांचे पिंपरी- चिंचवड महापालिकेचे नुकसान होण्याचा धोका होता आणि हा प्रकल्प मार्गी लागल्यास शहराचा किमान २०५० पर्यंतचा पाणीप्रश्न सुटणार आहे, अशी ठाम भूमिका आमदार लांडगे यांनी जुलै-२०२३ मध्ये झालेल्या मुंबईतील अधिवेशनात मांडली होती. त्याला त्याला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. याबाबत बोलताना आमदार लांडगे म्हणाले की, पवना बंद जलवाहिनी प्रकल्पामुळे शहराला सुमारे ४८ एमएलडी पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. २०११ मध्ये हा प्रकल्प राज्य सरकारने 'जैसे थे' आदेश देऊन थांबवला होता. त्यामुळे हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्य सरकार व केंद्र सरकारने प्रकल्पाचा खर्च उभा करावा. पवना धरणातून बंधाऱ्यापर्यंत पाणी आणताना पाण्याचे होणारे प्रदूषण आणि पाण्याची बचत, प्रदूषित पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी लागणारी यंत्रणा आणि खर्च याचा विचार करता बंद जलवाहिनी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. याबाबत स्थानिक शेतकरी आणि लोकप्रतिनिधी यांना विचारात घेऊन प्रकल्पाचे काम सुरू करावे, अशी मागणी राज्य सरकारला करणार आहे.







> **पिंपरी- चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या याचा विचार करता आगामी ५० वर्षांचा विचार करून नवीन जलस्रोत निर्माण करण्याबाबत तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेतली. त्यामुळे आंद्रा व भामा आसखेड प्रकल्पातून २६७ एमएलडी पाणी उपलब्ध होण्यास चालना मिळाली. आता पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाचे कामही प्रशासनाने लवकरात लवकर सुरू करावे आणि पिंपरी- चिंचवडकरांचा पाणी प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा, अशी अपेक्षा आहे. तसेच, सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचा विचार करून राज्यातील महायुती सरकारने हा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतल्याबद्दल पिंपरी- चिंचवडकरांच्या वतीने राज्य सरकारचे आभार व्यक्त करतो.**
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा.**

# 'ना नफा ना तोटा' तत्त्वावर पर्यावरण पूरक गणेशमूर्ती

## मातीच्या गणेशमूर्ती : इरफान सय्यद यांचा उपक्रम

**भोसरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करा या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आवाहनाला शिवसेना उपनेते, कामगार नेते इरफान सय्यद यांनी साथ दिली आहे. 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर शहरातील गणेशभक्तांना शाडुच्या, मातीच्या गणेशमूर्ती शिवसेना उपलब्ध करून देणार आहे. यामध्ये दगडूशेठ, सिंहासन, टिटवाळा, फेटा, मुकुट, अंभूजा या गणेशमूर्ती उपलब्ध असतील. इरफान सय्यद म्हणाले, भारतासह देशविदेशात पोहोचलेला गणेशोत्सव काळानुरूप बदलत आहे. मात्र आज साजरा होणारा गणेशोत्सव हे पर्यावरणाला हानीकारक तर ठरत नाहीत ना, याकडे मात्र लक्ष देण्याची वेळ आली आहे. गणपती हे आराध्य दैवत म्हणून ओळखले जाते. भाद्रपद शुद्ध चतुर्थीला गणरायाची विधिवत प्रतिष्ठापना करून त्याची मनोभावे पूजा केली जाते. गणेशोत्सवाचे महत्त्व लक्षात घेऊनच लोकमान्य टिळक यांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लोकसहभाग महत्त्वाचा मानून त्याला सार्वजनिक रूप दिले. कोणताही उत्सव साजरा करताना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची काळजी आपण सर्वांनी घेणे आवश्यक आहे. गणेशोत्सवामधील





पावित्र्य आणि पर्यावरण संरक्षण यासाठी गणेशोत्सव पर्यावरण पूरक पद्धतीने साजरा होणे ही काळाची गरज आहे. यासाठी आपण सर्वांनी आग्रही राहिले पाहिजे. प्रत्येकाने आपला दृष्टिकोन पर्यावरणस्नेही ठेवला तरच उत्सव साजरे करण्याबाबत सामाजिक परिवर्तन होऊ शकेल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले आहे. त्यात जास्तीत जास्त घरगुती गणेशाची मूर्ती ही शाडूच्या मातीची किंवा मातीची असावी असे आवाहन करण्यात आले आहे. आज आपण पर्यावरणाविषयी अधिक सजग झालो आहोत. त्यामुळे आपले प्रत्येक सण आणि उत्सव हे पर्यावरणपूरक पद्धतीने साजरे होणे आवश्यक आहे. अगदी आठ दिवसांवर येउन ठेपलेला गणेशोत्सव सुध्दा पर्यावरणपूरकच असायला हवा, कारण पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही काळाची गरज आहे. पर्यावरणाची काळजी घेऊन आपल्याला गणेशोत्सव साजरा करता येईल. आपले सण आणि उत्सव जोरात आणि पर्यावरण (झळाॲिळ) पूरक साजरा व्हावा याकरिता मुख्यमंत्री शिंदे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत शिवसेना उपनेते इरफान सय्यद यांच्या संकल्पनेतून गणेशभक्तांच्या करिता ना नफा ना तोटा या तत्त्वावर पर्यावरण पूरक मातीच्या गणेशमूर्ती उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामध्ये दगडूशेठ, सिंहासन, टिटवाळा, फेटा मुकुट, अंभूजा या गणेशमूर्ती उपलब्ध असतील. पिंपरी- चिंचवड शहर शिवसेना यांच्या सहकार्याने हे अभियान राबविण्यात येणार आहे. शाडूच्या मूर्तीसाठी स्टॉलधारकांनी प्रा. दत्तात्रय भालेराव ८६२४८६६६३३, अरुण जोगदंड ९२८४०४९०७७ आणि सुनील पवार ९४२१६६६९०० यांच्याशी या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# चिखलीत दफनभूमीऐवजी क्रीडांगणासाठी आरक्षण द्या!

## दुर्लक्ष केल्यास तीव्र आंदोलन



**चिखली । न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिकेच्या शाळेमध्ये सर्वाधिक पटसंख्या असलेल्या येथील शाळेला क्रीडांगणाची सुविधा नाही. परिणामी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यामध्ये बाधा निर्माण होत आहे. शाळेच्या शेजारी दफनभूमीचे आरक्षण रद्द करून ते क्रीडांगणासाठी आरक्षित करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते विकास साने यांनी महापालिका आयुक्त शिखर सिंह यांच्याकडे केली आहे. विद्यार्थ्यांअभावी महापालिकेतील काही शाळा बंद करण्याची वेळ आलेली असताना चिखली येथील महापालिकेच्या शाळेत पहिली ते आठवीपर्यंत सुमारे २४०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दरवर्षी पटसंख्येत वाढ होताना दिसत आहे. शाळेसाठी इमारत उभारण्यात आली आहे, शाळेत डिजिटल शिक्षणाच्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. त्याचबरोबर महापालिकेची लिफ्ट असलेली ही पहिली शाळा आहे. मात्र, शाळेसाठी क्रीडांगण नाही. खेळाचा तास असूनही मुलांना खेळता येत नाही. सरकार विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी डिजिटल शिक्षणाबरोबरच कला क्रीडा यासारख्या कलागुणांना वाव मिळावा यावर भर देत आहे. मात्र, चिखली येथील महापालिकेच्या शाळेत विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी तसेच सांस्कृतिक कार्यक्रम करण्यासाठी क्रीडांगण नाही. स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिनाच्या वेळी विद्यार्थ्यांना गावठाणातील चौकात उभे राहून आपले कार्यक्रम सादर करावे लागतात. परिणामी शाळेतील विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होते. महापालिका प्रशासनाने जबाबदारी घेऊन चिखलीतील गट नंबर १४३६ मध्ये दफनभूमीसाठी आरक्षित असलेल्या जागेवरचे आरक्षण हटवून ते क्रीडांगणासाठी आरक्षित करावे, अशी मागणी साने यांनी केली पालिकेने याकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# ‘गणेश इंटरनॅशनल’मध्ये आजी-आजोबा दिवस!



**चिखली । न्यूज एक्सप्रेस मराठी।** नेवाळे वस्ती येथील गणेश इंटरनॅशनल स्कूलमध्ये आजी-आजोबा दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतील सर्व शिक्षकांनी फुलांचा वर्षाव करून आजी-आजोबांचे स्वागत केले. आपल्या नातवांना शाळेत घेऊन जाणारी आजी आजोबा आणि या आजी-आजोबांना आधार देणारी लहानगी नातवंडे असा सुंदर मिलाप यावेळी पाहायला मिळाला. नातवंडांबरोबर शाळेत जाण्याचा योग आल्याने आजी-आजोबांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. प्रमुख पाहुण्या सुषमा वाघ यांनी एकत्र कुटुंब पद्धती आणि शालेय नियोजन या उपक्रमाची प्रशंसा केली. शाळेचे संस्थापक अध्यक्ष एस. एस. पाटील प्ले स्कूलप्रमुख भारती गडद, विजयलक्ष्मी हाके, शिल्पा गायकवाड उपस्थित होत्या. सूत्रसंचालन शीतल पागे व प्रगती काकडे यांनी केले. आभार विजयलक्ष्मी हाके यांनी केले.

# श्रावणी सोमवारनिमित्त शिवमंदिरात गर्दी!



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** शहरामध्ये भोसरी, मोशी, चिखलीसह चिंचवड परिसरातील जुनी सांगवी, दापोडी परिसरात शेवटच्या श्रावणी सोमवार निमित्ताने मंदिरांमधून भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. दापोडी गावठाणातील शिवकालीन मंदिरात पहाटेपासून भाविकांनी धार्मिक विधी, पूजा व दर्शनासाठी गर्दी केली होती. येथील गावठाणातील महादेव मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामस्थांच्या वतीने मंदिर परिसरात भाविकांसाठी मंडप टाकण्यात आला होता. दर्शन रांगामुळे परिसराला जत्रेचे स्वरूप आले होते. विविध मंडळे, सामाजिक संस्थेच्या वतीने फराळ, खिचडी वाटप व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. माहेश्वरी चौकातील वाहतूक बेट असलेल्या शिवमूर्ती परिसरात दरवर्षीप्रमाणे यंदाही महिला भजनी मंडळाचा कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी छाया भोसले यांच्या हस्ते महिला भजनी मंडळाचा सन्मान करण्यात आला. भजनी मंडळांना शंकरमूर्ती प्रतिकृती भेट देण्यात आल्या. या वेळी होमहवन, गौरव गायत्री वाघ यांच्या हस्ते होमहवन करण्यात आले.

# शहरामध्ये ५० टक्के तीनचाकी वाहने इलेक्ट्रिक करण्याचे लक्ष्य!

## ई-रिक्षासाठी ३० हजार अर्थसाहाय्य देण्यात येणार



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** शहरातील एकूण तीनचाकी वाहनांपैकी किमान ५० टक्के वाहने ही इलेक्ट्रिक असावीत. रिक्षाचालकांच्या पाठिंब्याने हे लक्ष्य साध्य होऊ शकते. सीएनजी ते इलेक्ट्रिक ऑटोरिक्षा हा बदल शक्य तितका सुलभ आणि किफायतशीर करण्यासाठी ऑटो-मालकांना महापालिकेचे पूर्ण सहकार्य राहील. ई-रिक्षा घेण्यासाठी चालकाला ३० हजार रुपयांपर्यंतचे अर्थसाहाय्य देण्यात येणार असल्याचे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले. पिंपरी-चिंचवड ईव्ही सेलच्या पुढाकाराने इलेक्ट्रिक ऑटोरिक्षांचा अवलंब करण्यात येणाऱ्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी बैठक झाली. अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उल्हास जगताप, सह शहर अभियंता संजय कुलकर्णी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अतुल आदे, रिक्षा संघटनेचे पदाधिकारी या वेळी उपस्थित होते. सिंह म्हणाले, की रिक्षाचालकांच्या समस्यांचे आणि प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी वेळोवेळी महापालिकेच्या वतीने कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. ई-रिक्षा घेण्यासाठी चालकाला ३० हजार रुपयांपर्यंतचे अर्थसाहाय्य देण्यात येणार आहे. सीएनजी ऑटोच्या तुलनेत इलेक्ट्रिक ऑटोरिक्षाकडे जाण्याच्या तांत्रिक, पर्यावरणीय आणि आर्थिक परिणामांबद्दल रिक्षा संघटनांना जागरूक केले जाईल. इलेक्ट्रिक ऑटोरिक्षाच्या आर्थिक व्यवहार्यता आणि इलेक्ट्रिक ऑटोकरिता भविष्यात वाहने चार्ज करण्यासाठी चार्जिंगच्या पायाभूत सुविधा निर्माण करता येतील. इलेक्ट्रिक ऑटोरिक्षा घेण्यासाठी इच्छुक असलेल्यांना बँक, तसेच आर्थिक संस्थांकडून करण्यात येणाऱ्या वित्तपुरवठ्याबाबत माहिती देण्यात आली आहे.

# मच्छी मार्केटवरून भाजप - काँग्रेसचे राजकारण

## मार्केटयार्डातील मच्छी मार्केट रद्द करण्याची फडणवीस यांची सूचना

पुणे।
न्यूज एक्स्प्रेस मराठी।
मार्केटयार्ड परिसरातील वाहनतळावर मच्छी मार्केट उभारण्याच्या कृषी उत्पन्न बाजार समितीने मंजूर केलेल्या प्रस्तावाला आमदार माधुरी मिसाळ यांनी विरोध केला. दरम्यान, मच्छी मार्केटवरून भाजप आणि काँग्रेसचे पुण्यात कुरघोडी राजकारण सुरू झाले आहे. तर, जैन समाजाने याला जोरदार विरोध करत सोमवारी विरोधात मोर्चा काढला. दरम्यान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचे पणन मंत्री अब्दुल सत्तार यांना पुण्यातील मार्केटयार्ड परिसरातील वाहनतळावर मच्छी मार्केट उभारण्याच्या कृषी उत्पन्न बाजार समितीने मंजूर केलेला प्रस्ताव रद्द करण्याची सूचना केल्याची माहिति आमदार माधुरी मिसाळ यांनी दिली.

आमदार मिसाळ म्हणाल्या, या भागात दाट लोकवस्ती आहे, मच्छी मार्केटमुळे आरोग्याची समस्या निर्माण होऊ शकते. या परिसरातील नागरिकांचा मच्छी मार्केटला तीव्र विरोध असून, मी नागरिकांसोबत आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जनभावना पोहोचविल्या असून, त्यांनी मंत्री सत्तार यांना प्रस्ताव रद्द करण्याच्या सूचना केल्या आहेत.सकल सर्वधर्म पुणे परिवाराच्या वतीने या निर्णयाचा विरोध करण्यासाठी मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चात सहभागी होऊन मी या निर्णयाला विरोध केला. मोर्चाने समितीचे सचिव राजाराम धोंडकर यांची भेट घेऊन निवेदन दिले. मिसाळ म्हणाल्या, सध्या मार्केटयार्ड परिसरात वाहनतळाची जागा अपुरी असल्याने, वाहतुकीची कोंडी होते. प्रस्तावित मच्छी मार्केटमुळे वाहनांच्या संख्येत वाढ झाल्याने, वाहतुक कोंडी होण्याची भीती आहे.मत्स्य व्यवसाय कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नियंत्रणाखाली असला, तरी सध्या परिसरात मच्छी मार्केटची गरज नाही, अशी या परिसरातील नागरिकांची मागणी आहे.



### भाजपच्या ढोंगीपणाचा निषेध : काँग्रेस

» पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीत भारतीय जनता पक्षाचे बहुमत आहे. या भाजपच्या संचालकांनी नुकताच मार्केटयार्डमध्ये मासे, चिकन, मटण विक्रीसाठी जागा देण्याचा निर्णय घेतला, आता या निर्णयाच्या विरोधात भारतीय जनता पक्षाच्या आमदार माधुरी मिसाळ, आ. सुनिल कांबळे आंदोलन करण्याची नौटंकी करत आहेत. भाजपच्या या दुटप्पीवागण्याचा, ढोंगीपणाचा करावा तेवढा निषेध कमी असल्याची भूमिका पुणे शहर काँग्रेस अध्यक्ष अरविंद शिंदे यांनी मांडली.

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीत भारतीय जनता पक्षाचे बहुमत आहे. या भाजपच्या संचालकांनी नुकताच मार्केटयार्डमध्ये मासे, चिकन, मटण विक्रीसाठी जागा देण्याचा निर्णय घेतला, आता या निर्णयाच्या विरोधात भारतीय जनता पक्षाच्या आमदार माधुरी मिसाळ, आ. सुनिल कांबळे आंदोलन करण्याची नौटंकी करत आहेत. भाजपच्या या दुटप्पीवागण्याचा, ढोंगीपणाचा करावा तेवढा निषेध कमी असल्याची भूमिका पुणे शहर काँग्रेस अध्यक्ष अरविंद शिंदे यांनी मांडली. १८ पैकी १३ सदस्य बाजार समितीत भाजपाचे आहेत. या संचालकांनी घेतलेल्या निर्णयाला भाजपाचेच आमदार विरोध करतात यामध्ये कांहीतरी काळंबेरं नक्की आहे. या परिसरात मोठ्या प्रमाणावर जैन बांधव राहतात. त्यांच्या श्रद्धा, भावनांशी खेळून त्यांना ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न भारतीय जनता पक्ष करत असल्याची शंका यामुळे येत आहे. बहुमताच्या बळावर हुकूमशाही पद्धतीने निर्णय लादायचा आणि त्या निर्णयाविरोधात भूमिका घेवून जैन आणि वारकरी समुदायाची सहानुभूती मिळवायचा केविलवाणा प्रयत्न भाजपाकडून होतोय.

# सार्वजनिक गणेश मंडळांनी अधिकृत वीजजोडणी घ्यावी!

## महावितरणचे आव्हान; अनधिकृत जोडणी केल्यास कारवाईचा इशारा

पुणे ।
न्यूज एक्स्प्रेस मराठी।
यंदाच्या गणेशोत्सवात सार्वजनिक मंडळांना विनाविलंब तात्पुरत्या नवीन वीजजोडण्या देण्यात येत आहेत. सर्वधर्मीयांच्या उत्सवासाठी घरगुती दराने वीजदर आकारण्यात येत आहे. त्यामुळे सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांनी तात्पुरती अधिकृत वीजजोडणी घ्यावी असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या काळात मंडपात शॉर्टसर्कीट होणे, विद्युत वायरिंगमध्ये बिघाड होणे आदी कारणांमुळे संभाव्य धोके टाळण्यासाठी सर्व गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित क्षेत्रातील महावितरणचे अभियंता व कर्मचारी यांचे भ्रमणध्वनी क्रमांक नोंदवून ठेवावेत. तसेच तातडीच्या मदतीची गरज भासल्यास पुणे व पिंपरी चिंचवड शहर, आंबेगाव, जुन्नर, मावळ,खेड, मुळशी, वेल्हे, हवेली तालुक्यांसाठी पुणे परिमंडलाने उत्सवातील दहा दिवसांसाठी ७८७५७६७१२३ हा विशेष संपर्क क्रमांक उपलब्ध करून दिला आहे. नेहमीच्या १९१२ किंवा १८००२१२३४३५ किंवा १८००२३३३४३५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधता येईल. गणेशोत्सवाच्या कालावधीत पावसाची शक्यता असल्याने



गणेश मंडळांनी संभाव्य धोके टाळण्यासाठी वीज यंत्रणेची योग्य काळजी घ्यावी. मंडपाची व रोषणाईसाठी विद्युत व्यवस्था व संच मांडणी ही अधिकृत विद्युत कंत्राटदारांकडूनच करून घेणे आवश्यक आहे. गणेश उत्सव मंडपातील वीजयंत्रणेचे अर्थिंग सुस्थितीत असल्याची खात्री करून घ्यावी. मंडळाच्या अंतर्गत वायरचे इन्सूलेशन खराब झाल्यास अशा वायरसमधून मंडपाच्या लोखंडी पत्र्यांमध्ये किंवा ओल्या वस्तुंमध्ये विद्युत प्रवाह येऊ शकतो. हा प्रकार टाळण्यासाठी वायरर्सचे जोड काढून टाकावेत किंवा जोड द्यायचा असल्यास योग्य क्षमतेच्या इन्सूलेशन टेपने जोड देण्यात यावा. स्वीचबोर्डच्या मागे प्लायवूड किंवा लाकडी फळी लावल्याची खात्री करून घ्यावी. विजेच्या लघुदाब व उच्चदाब वाहिन्या, रोहीत्र तसेच फिडर पिलर व इतर यंत्रेणेला गणेशोत्सवातील आणि मिरवणुकातील देखाव्यांचा स्पर्श होणार नाही याची दक्षता घ्यावी.

### अनधिकृत वापर केल्यास कारवाई

» गणेश मंडळांनी अनधिकृत विजेचा वापर केल्यास भारतीय विद्युत कायदा २००३ नुसार कारवाई करण्यात येणार आहे. गणेशोत्सवात वीजपुरवठा आणि जनरेटरसाठी स्वतंत्र न्यूट्रल घेणे अत्यावश्यक आहे. काही कारणास्तव वीजपुरवठा बंद असताना जनरेटर सुरु केल्यास एकाच न्यूट्रलमुळे जनरेटरमधील वीजप्रवाह लघुदाब वीजवाहिनीमध्ये प्रवाहित होतो व त्यातून जीवघेण्या अपघाताची शक्यता निर्माण होते. संततधार पाऊस व जोरदार वाऱ्यामुळे मंडपातील वीजयंत्रणेसह सार्वजनिक ठिकाणी लावलेल्या लाईटिंगचे वायर्स खाली झुकलेले नाही किंवा विस्कळीत झालेले नाहीत याची दैनंदिन तपासणी करावी असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

# पुणे जिल्ह्यात पावसाची पुन्हा उघडीप!

## शहरात दिवसभर फक्त ढगाळ हवामान

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शहरासह संपुर्ण जिल्ह्यातच पावसाने उघडीप दिल्याने ढगाळ हवामानासह ऊन सावल्यांचा खेळ सुरू आहे. शहरात दिवसभर फक्त ढगाळ हवामान होते. जिल्ह्यात घाटमाथ्यावर तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला. पुढील दोन दिवस हवामानाची स्थिती अशीच राहील, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. मागील आठवड्यात सक्रीय झालेला मॉन्सून आता काहीसा कमी पडला आहे. बऱ्याच ठिकाणी पावसाची उघडीप असून, दिवसभर कडक उन्हाचा सामनाही नागरिकांना करावा लागत आहे. ऊन आणि ढगाळ हवामानामुळे उकाडाही वाढला आहे. पुण्यासारखी राज्यातही अशीच स्थिती असून, विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशात पावसाने उघडीप घेतली आहे. मंगळवारी (ता. १२) कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी विजांसह मध्यम पावसाची शक्यता आहे. उर्वरित राज्यात हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. मॉन्सूनचा आस असलेला कमी दाबाचा पट्टा सर्वसाधारण स्थितीच्या दक्षिणेकडे सक्रिय असून, जैसलमेर, कोटा, गुना, सागर, पेंड्रारोड, बालासोर ते ईशान्य बंगालच्या उपसागरापर्यंत सक्रिय आहे. वायव्य मध्य प्रदेश परिसरावर समुद्र सपाटीपासून ७.६ किलोमीटर उंचीवर चक्राकार वारे वाहत आहेत. त्यापासून पूर्व मध्य प्रदेश, विदर्भ, दक्षिण छत्तीसगड ते आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा विस्तारला आहे.




### गुरूवारपासून पाऊस वाढण्याचे संकेत

» उत्तर अंदमान समुद्रात असलेली चक्राकार वाऱ्यांची प्रणाली पूर्व -मध्य बंगालच्या उपसागरात मनारच्या किनाऱ्यालगत समुद्र सपाटीपासून ३.१ ते ७.६ किलोमीटर उंचीपर्यंत कायम आहे. या प्रणालीच्या प्रभावामुळे गुरुवारपर्यंत (ता. १४) या भागात कमी दाब क्षेत्र तयार होण्याचे संकेत आहेत. राज्यातील पावसाची उघडीप आणखी दोन दिवस राहणार असून, गुरुवारपासून राज्यात पुन्हा पावसाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरातील संभाव्य कमी दाबाचे क्षेत्र पोषक ठरल्याने शुक्रवारपासून (ता. १५) राज्याच्या अनेक भागात पाऊस वाढण्याचे संकेत आहेत.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 'आप' लढविणार!

## आपने केले महासंकल्प जनसभेचे आयोजन

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** देशातील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीनंतर आम आदमी पक्ष (आप) आता महाराष्ट्रातील पुणे महापालिकेसह सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविणार असल्याची घोषणा 'आप'चे खासदार संजय सिंह यांनी सोमवारी (ता.११) येथे एका जाहीर कार्यक्रमात बोलताना केली. आम आदमी पार्टीच्या महाराष्ट्र शाखेच्या वतीने आज पुण्यात महासंकल्प जनसभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत ते बोलत होते. यावेळी 'आप'चे महाराष्ट्राचे सह प्रभारी गोपाल इटालिया, राज्य उपाध्यक्ष विजय कुंभार, धनंजय शिंदे, संघटक मंत्री अजित फाटके, संदीप देसाई, नविंदर अहलुवालिया, रियाज पठाण, अजित खोत, हनुमंत चाटे, मनीष मोडक, भूषण धाकुलकर, चंदन पवार, कनिष्क जाधव,मुकुंद किर्दत आदी उपस्थित होते. खासदार सिंह पुढे म्हणाले, "दिल्ली आणि पंजाब या राज्यात परिवर्तन होऊन तेथे आम आदमी पक्षाची सत्ता आली आहे. याचीच पुनरावृत्ती आता महाराष्ट्रात नक्की होणार, हा माझा विश्वास आहे. 'आप'ने बलाढ्य राजकीय पक्षांना घाम फोडण्याचे काम केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फक्त इडी, सीबीआयच्या जिवावर विरोधी पक्षाची सरकारे पाडून तेथे भाजपची सरकारे स्थापन करण्याची सवय लागली आहे. भाजपने जनतेला एकमेकांशी जातींच्या आधारे लढविण्याचे काम केले आहे. अदानीने सर्व देशच विकत घेतला आहे. आजच्या घडीला आकाशात उडणारे विमान अदानीचे, समुद्र अदानीचा, कोळसा अदानीचा यामुळे नरेंद्र मोदी फक्त अदानीचे पंतप्रधान आहेत. भाजपच्या सरकारमध्ये शेतकरी चिंतेत आहेत. सर्वसामान्य माणूस महागाईच्या खाईत लोटला गेला आहे. देशात सर्वत्र भ्रष्टाचार फोफावला आहे. गोपाल इटालिया म्हणाले,''आम्ही ज्यांना मतदान केले, त्यांनी आम्हाला फक्त काळोख दिला आहे. आता आम्हाला चांगल्या शिक्षणाची, दवाखान्यांची आवश्यकता आहे. यासाठी आता शेतकरी, कामगार, महिला विद्यार्थी यांच्या न्याय हक्कासाठी आम्हाला लढायचे आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या स्वप्नांचा महाराष्ट्र बनवायचा आहे.



### झाडू भाजपचे भूत उतरविणार

» भारतीय जनता पक्ष हा देशातील इडी', 'सीबीआय' यासारख्या केंद्रीय यंत्रणांचा धाक दाखवून आणि 'मोदी वॉशिंग पावडर'चा वापर करून विरोधी पक्षांची बहुमतातील सरकारे पाडत आहे. केंद्रीय यंत्रणांच्या गैरवापरातून महाराष्ट्रासह विविध राज्यात सरकार आणणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या डोक्यावर सत्तेचे भूत स्वार झाले आहे. पण भाजपचे हे सत्तेचे भूत 'आप'चा झाडूच उतरविणार असल्याचे मत खासदार संजय सिंह यांनी यावेळी व्यक्त केले.

# व्यसनासाठी मोबाईल चोरणाऱ्यास अटक

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** व्यसन भागविण्यासाठी मोबाईल चोरणाऱ्या सराईत गुन्हेगाराला पोलिसांनी अटक केली. त्याच्या ताब्यातून पाच लाख ६८ हजार रुपये किमतीचे ३२ मोबाईल आणि दुचाकी हस्तगत केली आहे. गुन्हे शाखेच्या युनिट एकच्या पथकाने ही कारवाई केली. रैय्यान ऊर्फ फईम फय्याज शेख (वय २०, रा. निहाल हाईटस, मिठानगर, कोंढवा खुर्द) असे अटक केलेल्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवार पेठेतील हिरा सदन इमारतीमधील घरातून चोरट्याने चार मोबाईल आणि रोकड चोरी केली. या प्रकरणी समर्थ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास युनिट एककडून करण्यात येत होता. पोलिस अंमलदार दत्ता सोनवणे यांना भवानी पेठेतील त्रिकोणी उद्यानाजवळ रैय्यान शेख येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त अमोल झेंडे, सहायक पोलिस आयुक्त सुनील तांबे यांच्या सूचनेनुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षक शब्बीर सय्यद यांच्या पथकाने सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. तपासादरम्यान आरोपीकडे चोरीचे ३२ मोबाईल संच आढळून आले. आरोपी घराच्या उघड्या असलेल्या दरवाजातून आणि खिडकीतून प्रवेश करून मोबाईल चोरत होता. त्याने काही पादचारी नागरिकांचेही मोबाईल हिसकावल्याची कबुली दिली आहे. मोबाईल चोरण्यासाठी त्याने दुचाकी देखील चोरली होती. त्याने खडक, फरासखाना, कोंढवा आणि समर्थ पोलिस ठाण्याच्या हद्दीत जुलै ते तीन सप्टेंबरदरम्यान मोबाईल चोरले आहेत. मोबाईल चोरीस गेलेल्या नागरिकांनी सोमवार पेठेतील गुन्हे शाखेच्या युनिट एकच्या कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.